महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा - 2018
(सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक पदाकरीता (मु.) परीक्षा)

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET No.**

दि. 26 ऑगस्ट 2018
(संयुक्त पेपर)

107733

**W11** संच क्र. **A**

**प्रश्नपुस्तिका – I**

**मराठी, इंग्रजी व सामान्य ज्ञान**

**एकूण प्रश्न : 100**
**एकूण गुण : 100**

**वेळ : 1 (एक) तास**

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|

केंद्राची संकेताक्षरे — शेवटचा अंक

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नांकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

**पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

1. खालीलपैकी कोणते उदाहरण दर्शक सर्वनाम आहे ?
   अ. ती दूरची गोष्ट आहे.
   ब. ही आत्ताचा घटना घडली.
   क. तो बघा सूर्यास्त.
   ड. हा बघा माझा रुमाल.

   **पर्यायी उत्तरे :**

   (1) ब व क बरोबर (2) क व ड बरोबर
   (3) अ व ड बरोबर (4) सर्व पर्याय बरोबर

---

2. 'ती फुलांना नाजुकपणे हाताळते' या वाक्यातील 'हाताळते' हे क्रियापद ________ या प्रकारात मोडते.
   (1) साधित क्रियापद (2) सिद्ध क्रियापद
   (3) प्रायोजक क्रियापद (4) गौण क्रियापद

---

3. 'गुरुजी शाळेत आत्ताच आले.' हे वाक्य : व्याकरणदृष्ट्या
   अ. अनेकवचनी आहे. ब. आदरार्थी आहे.
   क. आदरार्थी अनेकवचन आहे. ड. आदरार्थी बहुवचन आहे.

   **पर्यायी उत्तरे :**

   (1) अ व ब बरोबर (2) क व ड बरोबर
   (3) अ व क बरोबर (4) ब व ड बरोबर

---

4. पुढीलपैकी शब्दयोगी अव्यय असलेले वाक्य ____________
   (1) त्याला खालून कोणीतरी आवाज देत होते. (2) पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले होते.
   (3) समोर पाहते तो तुम्ही ! (4) लग्नघटिका समीप येऊन पोहोचली.

---

5. i. मुलगी जलद चालते.
   ii. मुलगा जलद चालतो.
   iii. मुली जलद चालतात.
   iv. मुले जलद चालतात.

   या वाक्यातील 'जलद' या शब्दाला क्रियाविशेषण अव्यय म्हणतात, कारण ________
   अ. चालणे या क्रियापदाबद्दल अधिक माहिती सांगते.
   ब. लिंग-वचन यात बदल केला तरी जलद या क्रियाविशेषणावर परिणाम होत नाही.

   **पर्याय उत्तरे :**

   (1) अ व ब बरोबर (2) फक्त ब बरोबर
   (3) फक्त अ बरोबर (4) अ व ब चूक



www.reliableacademy.com 9222338999

**6.** 'अक्षयला बारा भाषा येतात.' या वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात ________

(1) नाम (2) विशेषण (3) धातुसाधित (4) क्रियाविशेषण

---

**7.** पुढील वाक्यातील प्रयोग ओळखा :

'गाय गुराख्याकडून बांधली जाते.'

'न्यायाधीशाकडून दंड आकारण्यात आला.'

(1) कर्मणी प्रयोग (2) कर्मकर्तरी प्रयोग

(3) कर्तरी प्रयोग (4) यापैकी नाही

---

**8.** 'आ-कारांत' पुल्लिंगी नामाचे सामान्यरूप 'या-कारांत' होते. या नियमाला ________ हा शब्द अपवाद आहे.

(1) दादा (2) घोडा (3) नाना (4) मामा

---

**9.** अधोरेखित क्रियापदांचा प्रकार ओळखा :

i. मी घरी पोहोचण्यापूर्वीच सांजावले.

ii. उजाडले तेव्हा सकाळचे सहा वाजले होते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अनियमित क्रियापद (2) सिद्ध क्रियापद

(3) भावकर्तृक क्रियापद (4) प्रयोजक क्रियापद

---

**10.** अर्धविराम कधी वापरतात ?

अ. एकाच जातीचे अनेक शब्द असल्यास.

ब. दोन छोटी वाक्ये असल्यास.

क. शब्दांचा संक्षेप दाखवण्यासाठी.

ड. उभयान्वयी अव्ययानी जोडलेली असताना.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ व ब बरोबर (2) ब व ड बरोबर

(3) क व ड बरोबर (4) अ व ड बरोबर

---

**11.** पुढीलपैकी विधानात्मक वाक्य कोणते ?

(1) इथे बसू नकोस. (2) मला गोड आवडत नाही.

(3) आज पाऊस येणार नाही. (4) तू उद्या येणार आहेस का ?

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

12. नकारार्थी वाक्याला असेही म्हणतात.

(1) विरुद्धार्थी (2) द्वंद्वार्थी

(3) अकरणरूपी (4) करणरूपी

13. पुढीलपैकी संयुक्त वाक्य कोणते ?

(1) जर आज चांगले बीज पेरले तर उद्या चांगले पीक येईल.

(2) सण-उत्सव आनंद देतात पण गरीब लोकांचे खर्चामुळे कंबरडे मोडते.

(3) ती इतकी रडली की तिचे डोळे सुजले.

(4) आज जिकडे पहावे तिकडे माझी भावंडे आहेत.

14. त्याला पहिला वर्ग मिळावा. तो खूप अभ्यास करतो आहे. याचे मिश्रवाक्य बनवा.

(1) पहिला वर्ग मिळवण्यासाठी तो खूप अभ्यास करतो.

(2) पहिला वर्ग मिळवण्याच्या अपेक्षेने तो खूप अभ्यास करतो.

(3) त्याला पहिला वर्ग मिळावा म्हणून तो खूप अभ्यास करतो.

(4) तो खूप अभ्यास करतो कारण त्याला पहिला वर्ग मिळवायचा आहे.

15. 'रॉकेल टाकले असते तर लाकडे पेटली असती.' हे __________ या प्रकारातील वाक्य आहे.

(1) होकारार्थी (2) संकेतार्थी

(3) स्वार्थी (4) विद्यर्थी

16. खालील 'क्ष' आणि 'ज्ञ' गटातील चारही जोड्या योग्य जुळवणारे पर्यायी उत्तर कोणते ?

| 'क्ष' | | 'ज्ञ' | |
|---|---|---|---|
| अ. | पायंडा | I. | अवसान |
| ब. | मृत्यू | II. | आरंभ |
| क. | ऐदी | III. | अलंकार |
| ड. | आभरण | IV. | आळशी |

**पर्यायी उत्तरे :**

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | III | IV | I |
| (2) | II | I | IV | III |
| (3) | I | II | III | IV |
| (4) | III | IV | I | II |



www.reliableacademy.com 9222333999

17. 'पांढरे केस असलेल्या बाई मराठी विषय शिकवतात.' या वाक्यातील उद्देश्यविस्तारक कोणते ?

(1) पांढरे केस
(2) पांढरे केस असलेल्या
(3) मराठी विषय
(4) शिकवतात

---

18. वाक्य संश्लेषणानंतर जे वाक्य तयार होते

अ. ते केवलवाक्य असू शकते.
ब. ते मिश्रवाक्य असू शकते.
क. ते संयुक्त वाक्य असू शकते.

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व वाक्ये बरोबर
(2) अ व ब बरोबर क चूक
(3) अ व क चूक ब बरोबर
(4) अ व ब चूक क बरोबर

---

19. 'माझ्या नणंदेच्या सासूने उभ्या वर्षात एकदाही तिला माहेरी पाठवली नाही' या वाक्यातील 'पाठवली नाही' हे ____________ आहे.

(1) उद्देश्य
(2) विधीपूरक
(3) मूळ विधेय
(4) आधारपूरक

---

20. पुढील विधाने वाचा.

अ. एकाने माणसे मोजून पाहिली.
ब. ती नऊच भरली.

वरील वाक्यांचे संयुक्त वाक्यात रूपांतर करा.

(1) एकाने माणसे मोजून पाहिल्यावर ती नऊच भरली.
(2) एकाने माणसे मोजून पाहिली; पण ती नऊच भरली.
(3) जेव्हा एकाने माणसे मोजून पाहिली तेव्हा ती नऊच भरली.
(4) एकाने माणसे मोजून पाहिली, कारण ती नऊच होती.

---

21. 'गौरीला साडी शोभते' या वाक्यातील कर्म कोणते ?

(1) गौरीला
(2) साडी
(3) वाक्य अकर्मक आहे
(4) शोभते

---



www.reliableacademy.com 9422333999

**22.** पुढील वाक्ये चूक की बरोबर ते सांगा.

अ. वाक्यातील नाम किंवा सर्वनाम यांचे क्रियापदाशी जे संबंध असतात. त्यांना कार्यकार्थ असे म्हणतात.

ब. क्रियापदाशिवाय इतर शब्दांशी असलेले जे संबंध असतात त्या संबंधाना उपपदार्थ असे म्हणतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ चूक ब बरोबर
(2) अ बरोबर ब चूक
(3) अ व ब बरोबर
(4) अ व ब चूक

---

**23.** 'त्याचा पुरता मामा झाला,' या वाक्यातील विधीपूरक कोणते ?

(1) त्याचा
(2) पुरता
(3) मामा
(4) वाक्यात विधीपूरक नाही

---

**24.** पुढील म्हणीचा योग्य अर्थ सांगा.
'पाणी जोखणे'

अ. पात्रता ओळखणे
ब. लायकी काढणे
क. शक्तीचा अंदाज घेणे
ड. पाण्याची चव सांगणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त ब व ड बरोबर
(2) फक्त अ व ब बरोबर
(3) फक्त क व ड बरोबर
(4) फक्त अ व क बरोबर

---

**25.** कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज ऐकताच चोरांनी धूम ठोकली. यातील 'धूम ठोकली' या वाक्प्रचाराचा समानार्थी वाक्प्रचार

(1) सूंबाल्या करणे
(2) शंख करणे
(3) सव्यापसव्य करणे
(4) हतबल होणे

---

**26.** 'जशी आधीची परंपरा असेल तशी पुढची गोष्ट घडणे' या वाक्याच्या अर्थाची म्हण सांगा.

अ. बाप सवाई बेटा
ब. आई बापाची पूर्व पूण्याई
क. खाण तशी माती
ड. पुढचा वागे तसा मागचा चाले

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ व क बरोबर
(2) फक्त क व ड बरोबर
(3) फक्त ड बरोबर
(4) फक्त क बरोबर

---



www.reliableacademy.com 9222333999

27. नेहमीमॅच खेळायला जाताना सुनिता खो घालते.
अधोरेखित वाक्प्रचाराचा अर्थ
(1) आपले वर्चस्व प्रस्थापित करणे (2) अडथळा आणणे
(3) आतुरता वाढवणे (4) क्षमायाचना करणे

28. 'गुप्त गोष्ट तिसऱ्यास सांगणे' या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.
(1) दृढ मैत्री होणे (2) ढवळा ढवळ करणे
(3) षट्कर्णी होणे (4) शहानिशा करणे

29. संयुक्त वाक्य ओळखा.
(1) आरती सुरु झाल्यावर घंटानाद सुरु झाला.
(2) आरती सुरु झाली आणि घंटानादाला सुरुवात झाली.
(3) जेव्हा आरती सुरु झाली तेव्हा घंटानाद सुरु झाला.
(4) जर आरती सुरु झाली असती तर घंटानादही सुरु झाला असता.

30. 'घर घेण्याचे निश्चित ठरताच आजच मी रामभाऊना सुपारी दिली.'
अधोरेखित शब्दाला योग्य वाक्प्रचार सांगा.
अ. करार करणे
ब. शेवट करणे
क. सौदा करणे
ड. प्रारंभ करणे
**पर्यायी उत्तरे :**
(1) फक्त अ व ब बरोबर (2) फक्त ब व ड बरोबर
(3) फक्त अ व ड बरोबर (4) फक्त अ व क बरोबर

31. पर्यायी उत्तरांतील व्याकरणिक दृष्ट्या योग्य शब्दांचा गट कोणता ?
(1) इस्पितळ, उच्चार, उज्ज्वल, उशीर
(2) अलिकडे, आकस्मात, अप्रतीम, उशीर
(3) अस्तित्त्व, अनुवंशिक, आशिर्वाद, अंतीम
(4) उहापोह, ऊष्ण, उणिव, कठिण



www.reliableacademy.com 9222333999

**खालील उतारा वाचून त्याच्या खाली दिलेल्या प्रश्नांची (प्रश्न क्र. 32 ते 36) उत्तरे अचूक निवडा.**

एकनाथांनी मराठी साहित्यात एका नव्या युगाला प्रारंभ केला. तेराव्या शतकातील वाङमय बव्हंशी टीकात्मक व भक्तिपर आहे. महानुभावीय साती ग्रंथ, ज्ञानेश्वरी अमृतानुभव यासारखे काही निवडक वाङमय वगळले तर या काळातील बरीचशी रचना स्फुट स्वरूपाची आहे. देशियेचेनि नागरपणे । शांतु शृंगारतों जिणें या उक्तित म्हटल्याप्रमाणे मराठी साहित्यात आरंभी शांतरसालाच अग्रपूजेचा मान मिळाला होता. संतांच्या अभंगवाणीत मात्र भक्तिरसाचा उत्कर्ष आहे. तेव्हा शांत व भक्ती या दोन रसांनीच नाथपूर्व वाङमय व्यापले होते, असे म्हणावयास हरकत नाही. एकनाथांनी मराठी वाङमयाला जास्त व्यापक स्वरूप दिले. स्फुट व संकीर्ण रचनेप्रमाणचे वीस वीस हजार ओव्यांचे प्रचंड ग्रंथ देशभाषेत पैदा होऊ लागले. तसेच अध्यात्मपर ग्रंथाकडून कथा वाङमयाकडे मराठी साहित्य गंगेचा ओघ वळविण्याचे श्रेय एकनाथांना द्यावयास हवे. शिवाय रूक्मिणीस्वयंवर रचून मराठी भाषेत आख्यानपर काव्य लेखनाची प्रवृत्ती त्यांनी रुढ केली. रामचरित्र सारखा अनेक करुणरम्य व स्फूर्तिदायक प्रसंगानी भरलेला विषय एकनाथांनी निवडल्यामुळे सर्व रसांच्या परिपोषाला भावार्थ रामाणात मुबलक वाव मिळाला. त्यामुळे मराठी काव्याचा एकांगीपणा नष्ट होऊन शृंगार, वीर, करुण इत्यादी रसांचाही मराठी वाचकांना आस्वाद घेता येऊ लागला. ज्ञानेश्वरांच्या वाङमयात तत्त्वबोधावर जास्त भर दिलेला आहे. शिवाय या ग्रंथाना लोकोत्तर प्रतिभे ची जोड लाभल्यामुळे ते वाचताना पुष्कळदा आपण विरल कल्पनासृष्टीत वावरत आहोत असे वाटते. नामदेवांची करुणार्त वाणी ही आपणास कल्पनारम्य वातावरणातच नेऊन सोडते. एकनाथांनी ज्ञानेश्वरांचे तत्त्वज्ञान स्वर्गातून पृथ्वीवर आणले. नामदेवांच्या अत्युत्कट भक्तिभावनेला अधिक व्यवहार्य स्वरुप दिले. ज्ञानेश्वरांनी प्रतिपादिलेली उच्च तत्त्वे दैनंदिन जीवनात कशा तऱ्हेने उतरविता येतील, त्याचे त्यांनी आपल्या ग्रंथातून सांगोपांग विवेचन केले आहे. वेदान्त आणि व्यवहार, तत्त्वज्ञान आणि आचारधर्म यांचा त्यांनी बेमालूम मेळ घातला. आपल्या कथा ग्रंथाच्याद्वारे रचनेतही समन्वयबुद्धी मधूनमधून उचल खाते, अध्यात्माची छाप एकदम झुगारुन देणे प्रशस्त न वाटल्यामुळे दोन्ही ग्रंथात आरंभापासून अखेरपर्यंत रूपकांच्या योजनेने आध्यात्माचे अनुसंधान त्यांनी कायम राखले आहे.

एकनाथांचे दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे त्यांनी मराठी वाङमयाला पांडित्यांची प्रौढी आणून दिली. यादवकाळ ही मराठी वाङमयाची बाल्यावस्थाच होय. त्या वेळच्या भाषासरणीत प्रसन्नता, उत्साह, कोमलता, माधुर्य, उत्कटता, चापल्य, इत्यादी गुण आढळतात एकनाथांच्या काळी मराठी साहित्यात ओज, गांभीर्य, विशालता, चातुर्य, विपुलता, वैचित्र्य, इत्यादी गुणांचा अंतर्भाव झाला. एकनाथांचे वाङमय म्हणजे पांडित्य आणि प्रेमळपणा, वैदग्ध्य आणि सात्विकता, सामर्थ्य आणि सहृदयता यांचा मनोज्ञ संगमच होय.

**32.** एकनाथांचे पहिले महत्त्वाचे कार्य कोणते ?

(1) एकनाथांनी मराठी वाङ्मयाला अधिक व्यापक स्वरूप दिले.

(2) एकनाथांनी ज्ञानेश्वरी सोप्या भाषेत लिहिली.

(3) मराठी भाषेत शांत व भक्ती या दोन रसांतच रचना केली.

(4) त्यांनी जातीभेद दूर करण्याचे कार्य केले.

---

**33.** तेराव्या शतकातील वाङ्मयाबद्दल ***असत्य*** विधान कोणते ?

(1) या शतकातील वाङ्मय टीकात्मक व भक्तिपर आहे.

(2) या शतकात ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, भावार्थ रामायण, दासबोध सारखे ग्रंथ रचले.

(3) या काळात प्रारंभी शांतरसातच साहित्य रचना झाली.

(4) संत ज्ञानेश्वर या काळातील महान लेखक आहेत.

---

**34.** एकनाथांसाठी मराठी वाङ्मयात कोणते परिवर्तन घडवून आणले ?

(1) त्यांनी मराठी भाषेत कथा वाङ्मयाची सुरुवात केली.

(2) त्यांनी वाङ्मयातून तत्त्वबोधावर अधिक भर दिला.

(3) त्यांनी वाङ्मयातून अध्यात्माला पूर्ण विश्रांती दिली.

(4) त्यांनी मराठी भाषेची काठिण्य पातळी वाढवली.

---

**35.** यादव काळास मराठी वाङ्मयाचा बाल्यकाळ का म्हणतात ?

(1) संत ज्ञानेश्वरांनी अगदी लहान वयात वाङ्मय रचना केली.

(2) यावेळी मराठी भाषेत फार प्रगती झाली नव्हती.

(3) या वेळच्या भाषेत प्रसन्नता, उत्साह, कोमलता, चापल्य, इत्यादी गुण आढळतात.

(4) बाल्यावस्थेत माणूस जसा अनुभवातून संपन्न होतो तशी मराठी भाषा या काळात हळू हळू संपन्न होत होती.

---

**36.** एकनाथांच्या काळात मराठी साहित्यात कोणात्या गुणांचा अंतर्भाव झाला ?

(1) प्रसन्नता, उत्साह, कोमलता, माधुर्य, उत्कटता, चापल्य.

(2) ओज, गांभीर्य, विशालता, चातुर्य, विपुलता, वैचित्र्य

(3) पांडित्य, प्रेमळपणा, वैदग्ध्य, सात्विकता, सामर्थ्य, सहृदयता

(4) प्रौढी, महात्म्य, महानता, सौंदर्य

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9222333999

**37.** पुढीलपैकी _________ हा शब्द प्रत्ययसाधित आहे.

त्यागी, पथिक, पुजारी, उडी

(1) त्यागी (2) पथिक

(3) पुजारी, उडी (4) वरील सर्व पर्याय योग्य

---

**38.** पुढीलपैकी कोणता शब्द 'भुंगा' या शब्दाचा समानार्थी शब्द ***नाही*** ?

भ्रमर, अली, मिलिंद, मधुप

(1) भ्रमर, अली (2) मिलिंद, मधुप

(3) अली (4) सर्व शब्द समानार्थी

---

**39.** चुकीचा गट ओळखा :

(1) नेता, प्रणेता, अग्रणी, लीडर (2) मतभेद, तंटा, कलह, झगडा

(3) अंधार, तम, काळोख, तिमिर (4) भास्कर, भूप, भक्षक, भय

---

**40.** 'पाट' या शब्दाचा चुकीचा अर्थ ओळखा :

(1) बसायचा पाट (2) शेताला पाणी नेणारा कालवा

(3) विधवेचा विवाह (4) शरीराचा अवयव

---

**41.** _________ हा शब्द सामासिक शब्द ***नाही***.

(1) गोपाल (2) शीतलतनू

(3) भालचंद्र (4) वरील सर्व शब्द सामासिक आहेत

---

**42.** _________ हा शब्द तद्भव आहे.

(1) गुरु (2) कोवळा (3) पुत्र (4) पीडा

---

**43.** 'कधीही जिंकला न जाणारा' हा अर्थ असलेला नेमका शब्द कोणता ?

(1) अमर (2) अपराजित (3) जगज्जेता (4) अजिंक्य

---

**44.** पुढीलपैकी _________ हा शब्द अभ्यस्त शब्द ***नाही***.

(1) लाललाल (2) आडवातिडवा (3) पीडा (4) बाजारहाट

---

**45.** पुढीलपैकी _________ हा शब्द परभाषी आहे.

(1) ताकद (2) लेखक (3) रक्षक (4) भाषक

---



www.reliableacademy.com 9922333999

**46.** पुढील सामासिक शब्दांचे लिंग क्रमाने ओळखा :

साखरभात, देवघर, मीठभाकर

(1) पुल्लिंग, नपुंसकलिंग, स्त्रीलिंग (2) स्त्रीलिंग, नपुंसकलिंग, पुल्लिंग

(3) नपुंसकलिंग, पुल्लिंग, स्त्रीलिंग (4) पुल्लिंग, स्त्रीलिंग, नपुंसकलिंग

---

**47.** तारा आकाश पाहाते आहे.

अधोरेखित शब्दाची जात कोणती ?

अ. विशेषनाम

ब. सामान्यनाम

क. व्यक्तिनाम

ड. भाववाचक नाम

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ व ब बरोबर (2) क व ड बरोबर

(3) फक्त अ चूक (4) ब, क व ड चूक

---

**48.** धर्मिवाचक , धर्मवाचक, विशेषनाम, सर्वनाम यापैकी _______ हा नामाचा प्रकार ***नाही.***

(1) धर्मिवाचक (2) धर्मवाचक

(3) सर्वनाम (4) विशेषनाम

---

**49.** खालील वाक्यात अधोरेखित नामाचे प्रकार क्रमाने सांगा :

i. तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवा.

ii. विश्वास शाळेत गेला.

अ. सामान्यवाचक नाम – भाववाचक नाम

ब. भाववाचक नाम – विशेषनाम

क. भाववाचक नाम – सामान्यनाम

ड. विशेषनाम – भाववाचक नाम

**पर्यायी उत्तरे :**

(1) अ व ब बरोबर (2) ब व क बरोबर

(3) ब बरोबर (4) ड बरोबर

---

**50.** 'मुलांनो तुम्ही मोठ्यांची आज्ञा पाळली पाहिजे.' या वाक्यातील 'तुम्ही' हे सर्वनाम ________ आहे.

(1) प्रथमपुरुषी एकवचनी (2) द्वितीयपुरुषी अनेकवचन

(3) संबंधी सर्वनाम (4) अनुसंबंधी सर्वनाम

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

51. Use the correct tense form of the given verb :
Look, there she ____________ (come) !

(1) coming
(2) is coming
(3) comes
(4) has been coming

---

52. To err is human.

The underlined 'to-infinitive' in the sentence above functions as

(1) the object of a verb
(2) the subject of a sentence
(3) the subject of a verb
(4) the preparatory subject

---

53. Choose the correct sentences.

a. I am used for getting up early.
b. Before his marriage, Meeran used to spend a lot of his time in the club.
c. My wife is used to getting up early.
d. The Earth's resources are being used up at an alarming rate.

**Answer options :**

(1) Only a and b
(2) Only b and c
(3) Only a and c
(4) Only b, c and d

---

54. Choose the correctly framed questions.

a. What you were doing at two o'clock ?
b. When did she get married ?
c. Where did you hidden the letter ?

**Answer options :**

(1) Only b
(2) Only c
(3) Only a and c
(4) a, b and c

---

55. Which of the following sentences express the unreal condition ?

(1) If it rains on time, the farmers will sow the seed for kharif.
(2) If he had enough money, he would purchase every useful scientific device.
(3) If the Government tries to govern the people the most, they will turn it upside down.
(4) If the share market dwindles, we will lose our money.



www.reliableacademy.com 9222333999

**56.** Point out the ***wrong*** sentences :

a. If you do not marry, you will miss many precious life-experiences.
b. Unless you clean your hands, I will not serve you food.
c. If you do not take care of your old parents, you will rot in hell.
d. Unless you study hard, the bright future will not wait for you.

**Answer options :**

(1) Only a and c (2) Only b and d
(3) None of the above (4) All of the above

---

**57.** Which items from the given sentence contain errors ?

Everybody must paid more house rent; the tax on property have gone up.

(1) Everybody, must paid (2) must paid, have gone up
(3) more, house rent (4) tax on, must paid

---

**58.** Identify complex sentences.

a. They rewarded the man who rescued their son.
b. They rewarded the man.
c. A quick-witted dealer bought the car that I wanted.

**Answer options :**

(1) Only a and b (2) Only a and c
(3) Only b and c (4) a, b and c

---

**59.** It is imperative that he catch the next plane.

The sentence above expresses

(1) subjunctive mood
(2) imperative mood
(3) indicative mood
(4) None of the above

---

**60.** Point out the sentence that is ***not*** passive.

(1) We should not select our life-partner hastily.
(2) Promises are soon forgotten.
(3) That superstar was warmly welcomed in our college-gathering.
(4) English grammar is not properly taught in the classroom.

---



www.reliableacademy.com 9222233999

**61.** Identify the underlined clauses in the following sentences :

a. However hard I try, I always fail the test.

b. Since I lost my glasses yesterday, I haven't been able to do any work.

c. Do you know anyone who can lend me a laptop ?

**Answer options :**

(1) Adverbial clause, Adjective clause, Relative clause

(2) Adverbial clause, Adverbial clause, Relative clause

(3) Noun clause, Adverbial clause, Adjective clause

(4) None of the above

---

**62.** If he has time, he would telephone.

Which one of the following sentences corrects the underlined main clause in the sentence above ?

(1) If he has time, he should telephone.

(2) If he has time, he will telephone.

(3) If he has time, he shall telephone.

(4) If he has time, he has to telephone.

---

**63.** Fill in the blanks :

a. In a few States ____________ Kerala, there are more women than men.

b. I like classical music ____________ film songs.

**Answer options :**

(1) dislike, of

(2) unlike, from

(3) as well as, like

(4) like, as well as

---

**64.** Switzerland lies ____________ France, Germany and Italy.

Which of the following prepositions fills in correctly the blank in the sentence above ?

(1) between

(2) among

(3) beside

(4) besides

---

**65.** Select the closest meaning of the underlined idiom in the sentence :

Sunil did not do his job well, now he has to face the music.

(1) rerecord the song

(2) face bad consequences

(3) work again

(4) plead the authority



www.reliableacademy.com 9222333999

**66.** Select the correct meaning of the phrase underlined :

Mr. Gupta, who is one of the trustees of a big charity is suspected of feathering his own nest.

(1) being lazy in doing his work
(2) being too generous
(3) neglecting his job
(4) making money dishonestly

---

**67.** Select the appropriate meaning for the underlined phrase.

He has a habit of putting the cat among the pigeons.

(1) doing extreme things
(2) doing wrong things
(3) creating troubles and controversies
(4) doing good things

---

**68.** Which of the given options carries the meaning of the underlined idiom ?

A little more pressure, and he'll be out for the count.

(1) victorious (2) rich
(3) free (4) beaten

---

**69.** Select the most appropriate meaning of the underlined phrase/idiom :

It is necessary to keep our chin up in these stressful days.

(1) be strong (2) be proud
(3) be positive (4) (1) and (3)

---

**70.** Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Cut up rough | I. | To do something in a perfunctory way to save money and time |
| b. | Cut corners | II. | To destroy the main part of |
| c. | Cut a swath through | III. | To escape by running |
| d. | Cut and run | IV. | To become angry |

**Answer options :**

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | I | IV | II | III |
| (2) | IV | I | II | III |
| (3) | II | III | I | IV |
| (4) | IV | I | III | II |

---

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

71. Match the following :

| | | | |
|---|---|---|---|
| a. | Kick the bucket | I. | To complain uselessly about something that cannot be changed |
| b. | Kick against the pricks | II. | To discourage someone |
| c. | Kick someone in the teeth | III. | Make someone extremely annoyed |
| d. | Get someone's goat | IV. | To die |

**Answer options :**

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | III | IV | I | II |
| (2) | II | III | IV | I |
| (3) | I | IV | II | III |
| (4) | IV | I | II | III |

**Read the following passage carefully and answer the questions from 72 to 76 :**

He was a funny-looking man with a high, bald, dome-shaped head, a face very small in comparison, a round upturned nose and a long wavy beard that didn't seem to belong to such a perky face. His ugliness was a standing joke among his friends and he helped them to enjoy the joke. He was a poor man and something of an idler – a stone cutter by trade, a sort of semi-skilled sculptor. But he didn't work any more than was necessary to keep his wife and three sons alive. He preferred to talk. And since his wife was a complaining woman who used her tongue as an irate driver uses a horsewhip, he loved above all things to be away from home.

He would get up before dawn, eat a hasty breakfast of bread dipped in wine, slip on a tunic and throw a coarse mantle over it and be off in search of a shop, or a temple or a friend's house or the public baths, or perhaps just a familiar street corner, where he could get into an argument. The whole city he lived in was seething with argumentation. The city was Athens and the man we are talking about was Socrates.

Not only was he funny-looking, but he had funny ways and notions, and a good-natured magnetic stubbornness in sticking to them. One of his friends had asked the oracle at Delphi who was the wisest man in Athens. To the astonishment of all, the priestess had mentioned this idler, Socrates.

"The oracle," he said, "chose me as the wisest Athenian because I am the only one who knows that he doesn't known anything."

This attitude of sly and slightly mischievous humbleness gave him a terrific advantage in an argument. Pretending that he himself didn't know the answers, he would badge people with questions, and lead them to make astounding admissions.



www.reliableacademy.com 9222333999

**72.** The wisest person in Athens, according to the oracle at Delphi, was

(1) Socrates' wife
(2) the priestess
(3) Socrates
(4) a sculptor

**73.** What was a surprise for all Athenians ?

(1) The oracle's declaration that Socrates was the wisest Athenian.
(2) Socrates' claims that the oracle knows that Socrates did not know anything.
(3) Though Socrates was the wisest, he pretended not to know anything.
(4) The oracle did not know anything.

**74.** What are the true statements about Socrates, according to the passage :

a. Socrates was afraid of his wife.
b. Socrates loved talking more.
c. Socrates had funny notions.
d. Socrates had clever ways to make people accept his argument.
e. Socrates was pretentious.

**Answer options :**

(1) Only a, b and c
(2) Only b, c and d
(3) Only c, d and e
(4) Only a, b and e

**75.** The whole city was seething with argumentation.

The meaning of the underlined word in the given context is

(1) agitated
(2) simmering
(3) mad
(4) an act of boiling

**76.** Socrates deliberately went to different places so that

(1) he could get into an argument.
(2) he was saved from his wife.
(3) it helped Socrates to hide his ugliness.
(4) he could force people to make astounding admissions.

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.reliableacademy.com 9222333999

**77.** Select the correct alternative that transforms the following sentences into indirect narration :

i. The student said, "Shall we bring the book again tomorrow sir ?"

ii. "Come out of the building," said the inspector.

a. i. The student asked the teacher if they were to bring the book again the next day.

ii. The inspector ordered him to come out of the building.

b. i. The student questioned the teacher if they shall bring the book again the next day.

ii. The inspector begged him to come out of the building.

c. i. The student questioned the teacher whether to bring the book again tomorrow.

ii. The inspector invited him to come out of the building.

**Answer options :**

(1) Only a (2) Only b

(3) Only c (4) None of the above

---

**78.** Fill in the blank with the grammatically correct option :

Between the two, ____________ .

(1) he runs fastest (2) he runs the fastest

(3) he runs faster (4) he runs very fast

---

**79.** Choose the word closest in meaning to the one printed in CAPITALS.

Five members voted for the proposal, twelve voted against, and three ABSTAINED.

(1) Attain (2) Refrain

(3) Presume (4) Confer

---

**80.** Select the correct alternative that transforms the following sentence into passive :

They will take revenge on the murderer.

a. Revenge will be taken on the murderer by them.

b. The murderer will be taken on revenge by them.

c. The murderer will be taken revenge on.

d. The murderer shall be taken revenge upon.

**Answer options :**

(1) Only a (2) Only b and d

(3) Only a and d (4) Only a and c



www.reliableacademy.com 9822233999

81. माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत कमाल दंड/शिक्षा ही पुढील प्रमाणे आहे

(1) ₹ 10,000 (2) ₹ 25,000

(3) ₹ 50,000 (4) वरीलपैकी नाही

Maximum punishment/penalty provided under Right to Information Act is

(1) ₹ 10,000 (2) ₹ 25,000

(3) ₹ 50,000 (4) None of the above

82. 'माहिती अधिकार कायदा, 2005' अंतर्गत 'त्रयस्थ पक्ष' याचा अर्थ

अ. सदर कार्यालय व्यतिरिक्त पक्ष

ब. माहिती मिळण्याची विनंती करणारी नागरिकाव्यतिरिक्त व्यक्ती

क. सार्वजनिक प्राधिकरण

ड. समुचित शासन

वरीलपैकी कोणते विधान/विधाने बरोबर आहे/आहेत ?

**पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त अ

(2) फक्त ब आणि क

(3) फक्त अ, ब आणि क

(4) फक्त ब, क आणि ड

'Under Right to Information Act, 2005,' 'Third Party' means

a. a person other than that office where party seeks information

b. a person other than the citizen making a request for information

c. public authority

d. appropriate government

Which of the statement(s) given above is/are correct ?

**Answer Options :**

(1) Only a

(2) Only b and c

(3) Only a, b and c

(4) Only b, c and d



www.reliableacademy.com 9222333999

**83.** माहिती अधिकार कायद्यांतर्गत दारिद्र्य रेषेखाली असलेल्या व्यक्तीकडून, शासनाकडून माहिती मागण्यासाठी किती फी आकारण्यात येते ?

(1) खर्चाच्या 50 टक्के फी (2) एक-तृतीयांश फी

(3) फी आकारण्यात येत नाही (4) शंभर रुपये

Under the provisions of the Right to Information Act, if a person who is of below poverty line as may be determined by the appropriate government, requests for information, how much is the fee charged from him ?

(1) 50 percent of expenditure (2) One-third fee

(3) No fee shall be charged (4) One hundred rupees

---

**84.** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्रथम अपिल अधिकारी म्हणून कार्य करण्याकरिता ________ च्या किंवा त्याच्या समकक्ष दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती सार्वजनिक प्राधिकरण करील.

(1) गट 'ब'

(2) गट 'क'

(3) पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा

(4) कोणताही गट

As per the provisions of the Maharashtra Right to Public Services Act, the Public Authority shall appoint as an officer, not below the ________ or its equivalent rank, to act as First Appellate Authority.

(1) Rank of Group 'B'

(2) Rank of Group 'C'

(3) Inferior to Designated Officer

(4) Any rank

---

**85.** महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या कलम 23 मध्ये ________ याबाबत उल्लेख आहे.

(1) शिस्तविषयक नियमांना तरतूदी पूरक असणे

(2) अधिकारितेस रोध

(3) खोटी किंवा चुकीची माहिती इत्यादी देणाऱ्या पात्र व्यक्ती विरुद्धची कारवाई

(4) नियम करण्याचा अधिकार

Section 23 of Maharashtra Right to Public Services Act provides for ________ .

(1) Provisions to be supplemental to disciplinary rules

(2) Bar of Jurisdiction

(3) Action against eligible person for giving false or frivolous information

(4) Power to make rules



www.reliableacademy.com 9222833999

**86.** खालीलपैकी कोणती सोशल नेटवर्किंग साइट ***नाही*** ?

(1) विंक (2) गुगल प्लस

(3) लिंक्डइन (4) फेसबुक

Which of the following is ***not*** a social networking site ?

(1) Wink (2) Google Plus

(3) LinkedIn (4) Facebook

---

**87.** डिजीटल इंडिया या योजनेमध्ये इ-गव्हर्नंसद्वारे निवृत्तीवेतन मंजुरीचे अभिलेख व प्रदान बघता यावे यासाठी जी प्रणाली सुरु केली आहे त्या पोर्टलचा पत्ता __________ आहे.

(1) एच.टी.टी.पी:// पेंशन.एनआयसी.इन

(2) एच.टी.टी.पी.एस.// भविष्य.एनआयसी.इन

(3) एच.टी.टी.पी:// इ-पॅन.एनआयसी.इन

(4) एच.टी.टी.पी:// इ-ग्रिवनिक.एनआयसी.इन.

Digital India scheme with e-Governance has launched a portal with address _________ for getting record of pension sanction and payment tracking system.

(1) http://pension.nic.in

(2) https//bhavishya.nic.in

(3) http://E-pan.nic.in

(4) http://E-grivanic.nic.in.

---

**88.** सेवानिवृत्त सरकारी अधिकाऱ्यांना त्यांचा अनुभव इ-गव्हर्नंस द्वारे कळवता यावा व त्यातून व्यवस्थेत सुधारणा व्हावी म्हणून पंतप्रधान मोदीजी नी __________ या नावे प्रोजेक्ट सुरू केले.

(1) अनुभव (2) इक्स्पीरीअंस

(3) सक्सेस (4) गाईड

For retired government officers, the Prime Minister, Modiji launched an e-governance project called _______ , to share their experiences to improve systems.

(1) Anubhav (2) Experience

(3) Success (4) Guide

---



www.reliableacademy.com 9422333999

**89.** खालीलपैकी कोणत्या व्यक्तीला डिजीटल सिग्नेचर सर्टिफिकेट देण्याकरिता मान्यता देण्याचा अधिकार आहे ?

(1) कंट्रोलर

(2) कंट्रोलर ऑफ सर्टिफायींग अथॉरिटीज

(3) सर्टिफायीड इश्यूअर

(4) लायसन्स्ड अथॉरिटी

Which of the following persons has been granted a license to issue a Digital Signature Certificate ?

(1) Controller

(2) Controller of Certifying Authorities

(3) Certified Issuer

(4) Licensed Authority

---

**90.** भारतामध्ये पहिल्या संगणकाची स्थापना खालीलपैकी कोणत्या संस्थेत झाली ?

(1) इंडीयन इन्स्टिट्यूट ऑफ स्टॅटीस्टीक्स, दिल्ली

(2) इंडीयन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, अहमदाबाद

(3) इंडीयन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बेंगलोर

(4) इंडीयन स्टॅटीस्टीकल इन्स्टिट्यूट, कोलकता

In India, the first computer installation is done at the following institutes :

(1) Indian Institute of Statistics, Delhi

(2) Indian Institute of Management, Ahmedabad

(3) Indian Institute of Science, Bangalore

(4) Indian Statistical Institute, Kolkata



www.reliableacademy.com 9222333999

**91.** केंब्रिज ॲनालिटिका प्रकरण सध्या चर्चेत आहे.

अ. केंब्रिज ॲनालिटिका ही राजकीय डेटा विश्लेषक कंपनी आहे.

ब. फेसबुक युजर्सची वैयक्तिक माहितीचा परवानगीविना केंब्रिज ॲनालिटिकाने गैरवापर केला आहे.

क. केंब्रिज ॲनालिटिकाचे मुख्यालय वॉशिंग्टन (डी.सी.) मध्ये आहे.

वरीलपैकी कोणती बरोबर आहेत ?

(1) फक्त अ आणि ब (2) अ, ब आणि क

(3) फक्त अ आणि क (4) वरीलपैकी कोणतेही नाही

Cambridge Analytica was in news.

a. Cambridge Analytica is a political data analytics company.

b. Cambridge Analytica misused personal information of Facebook users without their consent.

c. The headquarters of Cambridge Analytica is in Washington (DC).

Which of the above are correct ?

(1) Only a and b (2) a, b and c

(3) Only a and c (4) None of the above

---

**92.** गुलेन चळवळीचे नेते फेतुल्ला गुलेन यांचा जन्म ________ मध्ये झाला.

(1) ताजिकीस्तान (2) उझबेकीस्तान

(3) तुर्कस्तान/टर्की (4) किरगीझस्तान

Fethullah Gülen, the leader of the Gülen movement, was born in

(1) Tajikistan (2) Uzbekistan

(3) Turkey (4) Kyrgyzstan

---

**93.** इसरो चे माजी अध्यक्ष प्रो. उडुपी रामचंद्र राव यांचे 24 जुलै, 2017 रोजी दु:खद् निधन झाले. त्यांना 2017 साली खालीलपैकी कोणता बहुमान देवून सन्मानित करण्यांत आले ?

(1) पद्‌म भूषण

(2) पद्‌म विभूषण

(3) शांती स्वरूप भटनागर पुरस्कार

(4) इसरो चा जीवन गौरव पुरस्कार

Former ISRO Chairman Prof. Udupi Ramachandra Rao passed away on July 24, 2017. He was conferred which of the following honours in 2017 ?

(1) Padma Bhushan

(2) Padma Vibhushan

(3) Shanti Swarup Bhatnagar Award

(4) Lifetime Achievement Award of ISRO

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

www.reliablepublications.com 9222333999

**94.** भारताची पहिली कुशलतेने आणि कल्पकतेने बनविलेली स्कॉर्पीन श्रेणीची पाणबुडी भारतीय नौदलाला सप्टे. 2017 मध्ये देण्यात आली आहे. या पाणबुडीचे नाव ________ आहे.

(1) आय.एन.एस. कलवरी (2) आय.एन.एस. अरिहंत
(3) आय.एन.एस. चक्र (4) आय.एन.एस. शल्की

India's first ingenuously skilfully built Scorpene Class submarine has been handed over to the Indian Navy in September 2017. The name of the submarine is _______ .

(1) INS Kalvari (2) INS Arihant
(3) INS Chakra (4) INS Shalki

---

**95.** जागतिक आरोग्य संघटनेत (WHO) ज्येष्ठ पद धारण करणाऱ्या पहिल्या भारतीय व्यक्ती ________ आहेत.

(1) डॉ. सौम्या स्वामीनाथन
(2) डॉ. कादंबिनी गांगुली
(3) डॉ. शिवरामकृष्ण अय्यर पद्मावती
(4) डॉ. इंदिरा हिन्दुजा

________ became the first Indian to hold the senior position in World Health Organisation (WHO).

(1) Dr. Soumya Swaminathan
(2) Dr. Kadambini Ganguly
(3) Dr. Sivramakrishna Iyer Padmavati
(4) Dr. Indira Hinduja

---

**96.** 2017 चा शरीरविज्ञानशास्त्र अथवा वैद्यकशास्त्र (Physiology or Medicine) क्षेत्रातील नोबेल पारितोषिक तीन विजेत्यांपैकी एक कोण आहेत ?

(1) मायकेल डब्ल्यू. यंग
(2) रिचर्ड हेन्डरसन
(3) बॅरी सी. बरीश
(4) रिचर्ड थेलर

Who among the following is one of the three winners of the Nobel Prize in Physiology or Medicine for the year 2017 ?

(1) Michael W. Young
(2) Richard Henderson
(3) Barry C. Barish
(4) Richard Thaler



www.eliteacademy.com 9222333999

**97.** खालीलपैकी कोणते विधान ***बरोबर*** आहे ?

(1) एम. व्यंकैया नायडू यांना भारताचे 14वे उपराष्ट्रपती म्हणून राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी शपथ दिली.

(2) एम. व्यंकैया नायडू यांना भारताचे 13वे उपराष्ट्रपती म्हणून भारताच्या मुख्य न्यायमूर्तींनी शपथ दिली.

(3) नायडू हे भारताचे उपराष्ट्रपती होणारे भारतीय जनता पक्षाचे दुसरे नेते आहेत.

(4) नायडू हे आंध्र प्रदेश मधून आलेले दुसरे भारताचे उपराष्ट्रपती आहेत.

Which one of the following statements is ***correct*** ?

(1) M. Venkaiah Naidu was sworn in as $14^{th}$ Vice-President of India by the President Ram Nath Kovind.

(2) M. Venkaiah Naidu was sworn in as $13^{th}$ Vice-President of India by the Chief Justice of India.

(3) Naidu is the second BJP leader to become Vice-President of India.

(4) Naidu is the second Vice-President of India from Andhra Pradesh.

---

**98.** ________ हे/ह्या *'ग्रीन सिग्नल्स : इकॉलॉजी, ग्रोथ अॅन्ड डेमोक्रेसी इन इंडिया'* या पुस्तकाच्या लेखक/लेखिका आहेत.

(1) मधु भटनागर

(2) वंदना शिवा

(3) चांडी प्रसाद भट्ट

(4) जयराम रमेश

________ is the author of the book *'Green Signals : Ecology, Growth and Democracy in India'*.

(1) Madhu Bhatnagar

(2) Vandana Shiva

(3) Chandi Prasad Bhatt

(4) Jairam Ramesh

---



www.reliableacademy.com 9222333999

**99.** भारत सरकारच्या संरक्षण मंत्रालयांतर्गत माजी सैनिक कल्याण विभागाची स्थापना ________ साली करण्यात आली.

(1) 2005 (2) 2004
(3) 2007 (4) 2014

The department of Ex-servicemen Welfare within the Ministry of Defence, Government of India was set up in

(1) 2005 (2) 2004
(3) 2007 (4) 2014

**100.** जोड्या लावा :

| 'अ' | | 'ब' | |
|---|---|---|---|
| अ. | ग्रीसचे पंतप्रधान | I. | अँजेला मर्केल |
| ब. | जर्मनीचे चॅन्सलर | II. | अॅलेक्सिस सिपरास |
| क. | फ्रान्सचे अध्यक्ष | III. | अॅना बर्नाबिक |
| ड. | सर्बियाचे पंतप्रधान | IV. | इम्यान्युल मॅकरॉन |

| | अ | ब | क | ड |
|---|---|---|---|---|
| (1) | II | I | IV | III |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | I | II | IV | III |
| (4) | I | II | III | IV |

Match the pairs :

| 'A' | | 'B' | |
|---|---|---|---|
| a. | Greek Prime Minister | I. | Angela Merkel |
| b. | German Chancellor | II. | Alexis Tsipras |
| c. | French President | III. | Ana Brnabić |
| d. | Serbian Prime Minister | IV. | Emmanuel Macron |

| | a | b | c | d |
|---|---|---|---|---|
| (1) | II | I | IV | III |
| (2) | II | I | III | IV |
| (3) | I | II | IV | III |
| (4) | I | II | III | IV |



www.reliableacademy.com 9222333999

## सूचना — (पृष्ठ 1 वरून पुढे.....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षाकक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 पर्यवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

## नमुना प्रश्न

प्र. क्र. **201.** सतीची चाल नष्ट करण्यासाठी कोणी मूलत: प्रयत्न केले ?

(1) स्वामी दयानंद सरस्वती (2) ईश्वरचंद्र विद्यासागर

(3) राजा राममोहन रॉय (4) गोपाळकृष्ण गोखले

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) राजा राममोहन रॉय" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तर-क्रमांक हा तुम्हाला स्वंतत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

**कच्च्या कामासाठी जागा/SPACE FOR ROUGH WORK**

www.reliableacademy.com 9922333999

परीक्षेचे नांव : महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा -2018 परीक्षेचा दिनांक : 26 ऑगस्ट, 2018

सहायक कक्ष अधिकारी, राज्य कर निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक पदांकरीता मुख्य परीक्षा

संयुक्त पेपर (पेपर क्र.1)

विषय : मराठी , इंग्रजी व सामान्य ज्ञान

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **"महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब (मुख्य) परीक्षा -2018" या स्पर्धा परीक्षेच्या** संयुक्त पेपर (पेपर क्र.1) प्रश्नपत्रिकेची प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती. त्यासंदर्भात उमेदवारांनी अधिप्रमाणित (Authentic) स्पष्टीकरण / संदर्भ देऊन पाठविलेली लेखी निवेदने, तसेच तज्ज्ञांचे अभिप्राय विचारात घेऊन आयोगाने उत्तरतालिका सुधारित केली आहे. या उत्तरतालिकेतील उत्तरे अंतिम समजण्यात येतील. यासंदर्भात आलेली निवेदने विचारात घेतली जाणार नाहीत व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

## उत्तरतालिका - KEY

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 1 | 4 | 3 | 2 | 2 |
| 2 | 1 | 2 | 1 | 3 |
| 3 | 2 | 3 | 3 | 2 |
| 4 | 2 | 2 | 2 | 4 |
| 5 | 1 | 2 | 1 | 1 |
| 6 | 2 | 2 | # | 1 |
| 7 | 2 | 1 | 3 | 2 |
| 8 | # | 3 | 4 | 1 |
| 9 | 3 | 2 | 1 | 3 |
| 10 | 2 | 1 | 4 | 2 |
| 11 | 3 | # | 2 | 4 |
| 12 | 3 | 3 | 3 | 4 |
| 13 | 2 | 4 | 2 | 4 |
| 14 | 3 | 1 | 4 | 4 |
| 15 | 2 | 4 | 1 | 4 |
| 16 | 2 | 2 | 1 | 2 |
| 17 | 2 | 3 | 2 | 4 |
| 18 | 1 | 2 | 1 | 3 |
| 19 | 3 | 4 | 3 | 1 |
| 20 | 2 | 1 | 2 | 1 |
| 21 | 1 | 1 | 4 | 4 |
| 22 | # | 2 | 4 | 3 |
| 23 | 3 | 1 | 4 | 3 |
| 24 | 4 | 3 | 4 | 2 |
| 25 | 1 | 2 | 4 | 4 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 26 | 4 | 4 | 2 | 1 |
| 27 | 2 | 4 | 4 | 2 |
| 28 | 3 | 4 | 3 | 2 |
| 29 | 2 | 4 | 1 | 1 |
| 30 | 4 | 4 | 1 | 2 |
| 31 | 1 | 2 | 4 | 2 |
| 32 | 1 | 4 | 3 | # |
| 33 | 2 | 3 | 3 | 3 |
| 34 | 1 | 1 | 2 | 2 |
| 35 | 3 | 1 | 4 | 3 |
| 36 | 2 | 4 | 1 | 3 |
| 37 | 4 | 3 | 2 | 2 |
| 38 | 4 | 3 | 2 | 3 |
| 39 | 4 | 2 | 1 | 2 |
| 40 | 4 | 4 | 2 | 2 |
| 41 | 4 | 1 | 2 | 2 |
| 42 | 2 | 2 | # | 1 |
| 43 | 4 | 2 | 3 | 3 |
| 44 | 3 | 1 | 2 | 2 |
| 45 | 1 | 2 | 3 | 1 |
| 46 | 1 | 2 | 3 | # |
| 47 | 4 | # | 2 | 3 |
| 48 | 3 | 3 | 3 | 4 |
| 49 | 3 | 2 | 2 | 1 |
| 50 | 2 | 3 | 2 | 4 |

6th Nov., 2018



# ने दर्शविलेले प्रश्न रद्द करण्यात आलेले आहेत.

www.reliableacademy.com 9822333399

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 51 | 3 | 3 | 2 | 4 |
| 52 | 2 | 2 | 2 | 3 |
| 53 | 4 | 2 | 4 | 1 |
| 54 | 1 | 1 | 1 | 2 |
| 55 | 2 | 1 | 2 | 1 |
| 56 | 3 | 2 | 4 | 1 |
| 57 | 2 | 2 | 3 | 1 |
| 58 | 2 | 4 | 4 | 3 |
| 59 | 1 | 1 | 4 | 2 |
| 60 | 1 | 2 | 2 | 4 |
| 61 | 2 | 4 | 4 | 3 |
| 62 | 2 | 3 | 3 | 2 |
| 63 | 4 | 4 | 1 | 4 |
| 64 | 1 | 4 | 2 | 1 |
| 65 | 2 | 2 | 1 | 2 |
| 66 | 4 | 4 | 1 | 3 |
| 67 | 3 | 3 | 1 | 2 |
| 68 | 4 | 1 | 3 | 2 |
| 69 | 4 | 2 | 2 | 1 |
| 70 | 2 | 1 | 4 | 1 |
| 71 | 4 | 1 | 3 | 2 |
| 72 | 3 | 1 | 2 | 2 |
| 73 | 1 | 3 | 4 | 4 |
| 74 | 2 | 2 | 1 | 1 |
| 75 | 1 | 4 | 2 | 2 |

| प्रश्न क्रमांक | उत्तरे | | | |
|---|---|---|---|---|
| | संच A | संच B | संच C | संच D |
| 76 | 1 | 3 | 3 | 4 |
| 77 | 1 | 2 | 2 | 3 |
| 78 | 3 | 4 | 2 | 4 |
| 79 | 2 | 1 | 1 | 4 |
| 80 | 4 | 2 | 1 | 2 |
| 81 | 2 | 1 | 1 | 2 |
| 82 | 2 | 2 | 1 | 1 |
| 83 | 3 | 1 | 1 | 1 |
| 84 | 1 | 2 | 3 | 3 |
| 85 | 3 | 4 | 4 | 2 |
| 86 | 1 | 1 | 2 | 1 |
| 87 | 2 | 3 | 1 | 1 |
| 88 | 1 | 2 | 1 | 1 |
| 89 | 2 | 1 | 3 | 3 |
| 90 | 4 | 1 | 2 | 4 |
| 91 | 1 | 1 | 1 | 3 |
| 92 | 3 | 3 | 2 | 1 |
| 93 | 2 | 4 | 1 | 3 |
| 94 | 1 | 2 | 2 | 2 |
| 95 | 1 | 1 | 4 | 2 |
| 96 | 1 | 2 | 2 | 2 |
| 97 | 3 | 2 | 2 | 4 |
| 98 | 4 | 3 | 3 | 1 |
| 99 | 2 | 1 | 1 | 2 |
| 100 | 1 | 3 | 3 | 1 |

www.reliableacademy.com 9222333999